Vol 5 Issue 10 April 2016 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 Impact Factor : 3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 10 | April - 2016



Golden Research Thoughts

GRT

# स्त्रियांचे शोषण '' तो मी नव्हेच '' व ''पांढरा बुधवार नाटकाच्या अनुशंगाने

दिलीप अलोणे



दिलीप अलोणे,

**सारांश –**

प्र.के.अत्रे लिखित ''तो मी नव्हेच'' हया सामाजिक नाटकाचा पहिला प्रयोग 8 ऑक्टोबर 1962 रोजी दिल्ली येथे सादर केला. अत्रे यांचे मराठी वाङ्मयात एक वेगळे स्थान आहे. विनोदी लेखक, विडंबनकार आणि प्रहसनकार म्हणुन त्यांची विशेष ओळख आहे. अत्रेंच्या इतर नाटकांप्रमाणेच ''तो मी नव्हेच'' या नाटकाने लोकप्रियतेचे शिखर गाठले आहे. त्यांचे पहिले नाटक ''साष्टांग नमस्कार'' हे रंगभूमीवर आले आणि मराठी नाटयसृष्टीतील एका नव्या कालखंडाला प्रारंभ झाला. यानंतर त्यांनी 'घराबाहेर', 'लग्नाची बेडी', 'उधाचा संसार,', 'कवडीचुंबक', 'मोरुची मावशी' वगैरे नाटके लिहून मराठी रंगभूमीवर आपला ठसा उमटविला.

## प्रस्तावना

1962 साली त्यांनी लिहिलेल्या ''तो मी नव्हेच'' या नव्या समस्याप्रधान गंभीर नाटकाने लोकप्रियतेचे आणि उत्पन्नाचे आजपावेतोचे सर्व उच्चांक मोडले. महाराष्ट्राचे कौटूंबिक मत अत्र्यांच्या पूर्ण परिचयाचे त्यामुळे मराठी कुटूंबाच्या सुख दुःखांना वाचा फोडणारे एक प्रभावी, हदयस्पर्शी आणि ज्वलंत असे नाटय त्यांनी ''तो मी नव्हेच'' या नाटकाद्वारे मराठी प्रेक्षकांसमोर ठेवले आणि त्याचे महाराष्ट्राने अभूतपूर्व स्वागत केले. 'लखोबा लोखंडे' नावाच्या व्यक्तिमत्वाभावेती फिरणा–या आणि त्याने केलेल्या गुन्हयाभावेती हे नाटक फिरतांना दिसते. संपूर्ण नाटाकत ''तो मी नव्हेच'' या आरोपीच्या पहिल्यापासून शेवटपर्यत असलेल्या एकच एक पालूपदावरुन या नाटकाला ''तो मी नव्हेच'' हे नाव देणे अत्रोंना योग्य वाटले.



लखोबा लोखंडे हा निपाणीचा तंबाखूचा व्यापारी परंतू त्याने अनेक नावे व रुपे बदलून लोकांना लूबाडले यासाठी त्याला अटक करण्यात आली ॲड.विप्रदास आरोपीचे कारनामे कोर्टात वाचतात. ज्या स्त्रीयांना त्याने फसविले त्याना कोर्टात साक्षिदार म्हणून उभे केले जाते. तसेच ज्या पध्दतीने आरोपी मधुकर विनायक देशमुख म्हणून दिल्लीला पंडित नेहरुंच्या खाजगी सी.आ.डी. तर दिवाकार गणेश दातार, म्हणून बंगलोरला म्हैसून सरकारच्या पोलिटिकल खाल्यातला वरिष्ठ अधिकारी आणि अशोक परांजपे म्हणून विशाखापटटम येथे आरमारातला एक बडा कॅप्टन तर महाभारत, रामायण, कुराण, बायबल यांच बाळकडू मिळालेला अतंतकोटि ब्रम्हांड नायक राधेश्याम महाराज आणि तितवयाच सफाईने रेव्हरंड जॉनी वॉकर बनून डोंगरावरच्या उपदेशाचे निरुपन करणारा व्यक्ती दुसरा तिसरा कोणी नसून लखोबा लोखंडेच आहे. हे कोर्टाला पटवून देतो. या सर्व साक्षी पूराव्यांवरुन आरोपीला कडक शिक्षा झाली पाहिजे. असे सरकारी वकिल कोर्टाला सांगतात. यावर आपली बाजू मांडताना आरोपी लखोबा लोखंडे आपण निपाणीचा तंबाखू व्यापारी असून, व्यापारा निमित्य नागपूरला आलो असताना पोलीसांनी आपल्याला पकडले. आपली एकच पत्नी चन्नका लोखंडे ही असून आपल्याला पाच मूले आहेत. आपला इतर स्त्रीयांशी काहीच संबंध नाही. त्यांनी केलेले आरोपही अक्षरशा खोटे आहेत हे पटवून देण्याचा प्रयत्न करतो. ज्या स्त्रीयांचे आयुष्य उध्वस्त झाले त्या सुनंदा दाते, प्रमिला परांजपे, चंद्राबाई, चंद्राबाईची मुलगी वेणू यांना मुर्ख माणून आपण त्यांना कधीच पहिले नाही आणि यासर्व नावांशी माझा कोणताही संबंध नाही. हेच कोर्टाला वारंवार पटवून देण्याचा प्रयत्न

करतो. ॲड.विप्रदास व आरोपी लखोबा लोखंडे यांनी कोर्टासमोर सादर केलेल्या पूराव्या वरुन न्या.प्रभाकर आरोपीला वेगवेगळया कलमान्वये सात वर्षे शिक्षा ही कमीच आहे असे वाटून आरोपीचा भाऊ सय्यद त्याचा सुरा खूपसून खून करतो आणि अशी व्यक्ती समाजासाठी धोका असून त्यांचा संपूर्ण नायनाट करणेच योग्य असे म्हणतो.

अत्र्यांच्या ''तो मी नव्हेच'' या नाटकातील महत्वाचे वैशिष्टय म्हणजे या नाटकात त्यांनी फिरता रंगमंच सादर केला. एक प्रयोग संपताच दुस–या प्रयोगावर प्रकाश टाकून नाटक समोर जाताना दिसते. अशा रितीने नाटयलेखनाचे तंत्राचे आणि लोकप्रियतेचे सर्वच उच्चाक या नाटकाने मोडले. गेल्या दिडशे वर्षात महाराष्ट्रात कोणतेही नाटक व्यवहाराच्या दृष्टीने देखीले एवढे यशस्वी झालेले नसेल आणि प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीने हया नाटकातल्या भयानक वास्तववादाने प्रौढ कुमारिकांच्या आणि त्याच्या मातापिल्यांच्या डोळयांत चरचरीत अंजन घालून आणि त्यांना जागृत करुन सामाजिक सुधारणेचे एवढे प्रचंड कार्य केले आहे की त्याचे मोजमाप होणार नाही. हया नाटकाचे खरे यश माधव काझीच्या उलट तपासणीमध्ये आणि त्याच्या अखेरच्या बचावाच्या भाषणात आहे. कायद्याची ज्याला माहिती आहे. त्याच्या सहज लक्षात येईल. माधव काझीने आपल्यातर्फे बकील दिला नाही आणि आपल्या बचावाचे काम स्वतःच केले हे नाटकाकाराच्या दृष्टीने फार उत्तम होते कारण त्यामुळे नाटकाकाराला त्याच्या कायद्याचे ज्ञान उलट तपासणीत आणि बचावाच्या भाषणात वापरता आले. ''तोमी नव्हेच'' सारखे माधव काझी खटल्यावरील नाटक मात्र प्रयोगांचा उच्चांक गाठते पण त्यातून जे दर्शन घडते ते केवळ अुपरोधिक विनोद व प्रायोगिक सुक्तांच्या आधारावर तरलेले असते. एकाच व्यक्तिची वेषांतरे आणि फिरता रंगमंच अत्रेंनी या नाटकांच्या माध्यमातून रंगभूमीवर सादर केला.

प्र.के.अत्रे यांच्या ''तो मी नव्हेच'' या नाटकाने ज्या पध्दतीने सर्व उच्चांक मोडले असा चमत्कार मराठीतल्या दुस–या कोणत्याही नाटककाराने करुन दाखविले नाही. अत्रें लिहितील ते संवाद ऐकायला प्रेक्षक इतके आतुर असतात की, त्यापुढे नाटकातील इतर गोष्टींना आपोआप दुय्यम दर्जाचे स्थान प्राप्त होते. विनोद हा अत्रेंच्या वक्तृत्वाचा भाग होता. त्यांच्या नाटकांमुळे त्यांची व्याख्याने आणि व्याख्याणामुळे त्यांची नाटके लोकप्रिय व्हावयास मदत झाली. परिणामकारक पण सोपी भाषा आणि विचारांची सुस्पष्टता ही त्यांच्या साहित्याची वैशिष्टये आहेत.

### *पांढरा बुधवार :–*

एक दलित जाणिवेचे नाटककार म्हणून प्रेमानंद गज्वी यांचे नाव मराठी नाटयवाङ्‌मयामध्ये गाजलेले आहे. त्यांच्या नाटकांनी मराठी नाटयवाङ्‌मय प्रकार सकस केला आहे. 'घोटभर पाणी', 'देवनगरी' , 'तन–माजोरी, 'किरवंत', 'गांधी'–आंबेडकर,' ही त्यांची मोजकीच पण अतिशय गाजलेली नाटके आहेत. या नाटकाचा विषय दीन दलितांच्या शतकानुशतके चालत आलेल्या हालअपेष्टा यावरचा आहे. वैदिक आर्य ब्राम्हणांनी केलेली मूळनिवासी भारतीयांची दशा गज्वींनी पोटतिडकीने मांडलेली आहे. गज्वीची नाटयरुपे सुबोध आणि थेट असतात. कथानकाची नाटकात गुंतागुंत, पात्रांची गर्दी, प्रसंगाचे अनावश्यक कृत्रिम नाटय यांचा आश्रय त्यांना घ्यावा लागत नाही. तरी नाटकाचा अपेक्षित परिणाम ही नाटयरुपे साधतात. या नाटयरुपाला एक आंतरिक लय असते. आशयाची, दुःखाची आवर्तने ध्वनित करणारी ती लय असते. म्हणून ती आशयापासून वेगळी काढता येत नाही. गज्वींच्या नाटयरुपाचे हे सुप्त सामर्थ्य, त्याचे प्रत्यंतर त्यांनी केलेल्या काव्यरचनेत सापडते, हे काव्य योग्य ठिकाणी अंतर्भूत केलेले असते.

प्रेमाचंद गज्वी यांचे ''पांढरा बुधवार'' हे नाटक 22 ऑक्टोंबर 1995 साली ''कलासाधना'' मुंबई या संस्थेने प्रथम रंगभूमीवर आणले. गज्वींनी या नाटकातून आंतरिक करुणेन व्यथित होणा–या व्यथेचा विचार मांडला आहे. स्त्री ही मूक्त झाली असली तरी सूसंस्कुत समाजात ती बंदीस्तच आहे. याचे चित्रण गज्वीनी या नाटकातून केले. कुमारी मातेचा प्रश्न नाटकातून मांडून गज्वींनी प्रेक्षकांचे / वाचकांचे लक्ष वेधलेले दिसते. जुन्या काळापासून आजच्या घडीलाही कुमारी मातेचा प्रश्न समाजात तितकाच जुना असलेला दिसून येतो. या नाटकामध्ये कुमारी मातेचा प्रश्न गज्वींनी नंदिनी या स्त्री पात्राच्या भोवती गुंफलेला दिसतो. नंदिनी ही सूसंस्कृत ब्राम्हण घराण्यातील त्याच्या सतारीच्या धूंद स्वरांवर प्रेम करुन त्याला आपल सर्वस्व अर्पण करते. परंतु या प्रेमाला नंदिनीच्या आईवडीलांकडून विरोध होतो. त्यांना मान्य नसल्याने ते त्याला नंदिनीपासून कायमचा दूर करतात. तो दूर गेला असला तरी त्याचं अंकूर नंदिनीच्या उदरात वाढत असतं. त्यालाही मारण्याचा प्रयत्न होतो. पण दादू हा गडी माणूस त्या अंकूराला वाचवतो व आपल मूल म्हणून आपली पत्नी निंबी हिच्या कुशीत घालतो. व त्याला वाढवतो. नंदिनीची आई मरतांना तीचे मूल दादूच्या घरी वाढत आहे हे सांगते. त्यावरुन दादू, निंबी व मूलगा वकटू याला वाडयावर घेवून येतो. वकटूला बघून नंदिनी मधील आई जागी होते व ती आपल्या मुलाला मिळविण्यासाठी पांढ–या बुधवाराचे व्रत करते. निंबीचा अपमान करते, तिला वांझ म्हणून तीचा मुलगा तिच्या पासून हिरावते. वकटू आपला नाही आपण वांझ आहो या धक्याने निंबी वेडी होते. या सर्व गोष्टीकडे दादू असाहयतेने बघत असतो. तो नवरा व बाप म्हणून काहीच करु शकत नाही. वकटूला मिळविण्याच्या प्रयत्नात नंदिनी दादू, निंबी, व्यास भटजी, वकटू यांना दुखावते. त्यामुळे ही तिच्यापासून दूरावत जातात. दादू निंबीला वेडयाच्या दवाखाण्यात घेवून जातो. व तिथेच काही काळ राहतो. इकडे वकटूला आपले आईबाबा आपल्याला सोडून गेले असे वाटून तो त्यांच्या शोधात घरातून निघून जातो. व शेवटी या सर्वापासून दूरावलेली नंदिनी एकटीच राहते.

नाटकंकाराने मनस्विनीच्या द्वारे नंदिनीच्या मनाचे चित्रण मांडलेले दिसते. नंदिनीच्या प्रेमळ तसाच बेधडक, स्वतःचाच विचार करणारा स्वभाव या दोघांचे चित्रण येथे होते. मनस्विनीच्या माध्यमातून नंदिनीतील हरवलेले सत्य शोधण्यास मदत होते. जेव्हा नंदिनी अनाथालयाला देणगी देण्यासाठी माझ्याकडे पैसे नाही असे सांगते तेव्हा मनस्विनीच्या मनाचा ताबा घेवून तीचे अभिनंदन करते आणि म्हणते, ''ज्या क्षणाची मी आतुरतेनेर वाट पाहत, होते तो क्षण तू आज मला दिलास........ डॅशिंग, बेदरकार मनाला वाटेल, पटेल तसं, वागणं, जगणं हेच तर तुझं खरं रुप'' अशी नंदिनीला जाणिव करुन देते तर दूस–याच क्षणी ती वकटूला मिळविण्यात कशी चुकली, निंबीचा कसा अपमान केला याची ही जाणिव करुन देते. अतिशय उत्कृष्ट पध्दतीने नाटककाराने ''ती'' निर्माण करुन नाटकात नवचेतना आणण्याचा प्रयत्न केला आहे. 'तीच्या माध्यमातून चांगल्या वाईट गोष्टींचा विचार नाटकात होताना दिसतो.

गज्वींनी या नाटकाच्या द्वारे काळ कितीही बदलला, स्त्रीया शिकल्यात त्यांना नव्या जाणिवा मिळाल्यात तरीही जून्या पारंपारीक संस्कारांच्या ओझेयाखाली त्या दबलेल्या आहे. त्यांना एका सांस्कृतीक बेटाच्या रुपाने हा समाज बंदिस्त करीत आहे. संस्कार, परंपरा सूशिक्षितपणा यांच्या दडपणाखाली त्यांच्या यशांचे शिखर दबलेले दिसतात. स्त्रीयां कितीही पूढे गेल्या तरीही त्यांना संस्कृतीच्या बंधनातून

सूटका नाही त्यांच्या उंच भरारीला किंवा आधूनिक विचारांना समाजात आजही मान्यता मिळालेली दिसत नाही. म्हणूनच प्रेमानंद गज्वींनी ''पांढरा बुधवार'' या नाटकातून बंदिस्त सांस्कृतिकतेचं दर्शन घडविण्याचा प्रयत्न यशस्वी रित्या केलेला दिसतो.

वास्तविक आचार्य अत्रे यांचे ''तो मी नव्हेच'' आणि प्रेमानंद गज्वी यांचे ''पांढरा बुधवार'' या दोन्ही नाटकाच्या लेखनप्रपंचात जवळपास तेविस वर्षाचा कालखंड आहे. एका सत्य घटनेचा आधार घेऊन रंगभूमीवर फिरत्या रंगमंचाचे तंत्र आणित आचार्य अत्रे यांनी समाजाच्या विविध स्तरावरील महिलांचे शोषण, करणारा आणि प्रत्येक वेळी ''तो मी नव्हेच'' असे म्हणत पुन्हापुन्हा महिलांची फसवणुक करणारा, त्यांचे आयुष्य अुध्वस्त करणारा निपाणीचा तंबाखूचा व्यापारी लखोबा लोखंडे साकारला. समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला. नाटकातील सुनंदा दाते, प्रमिला  पराजपे, चंद्राबाई तिची मुलगी वेणू यांची फसवणुक करुन लखोबाने त्यांचे आयुष्य अुध्वस्त केले आहे.

प्रेमानंद गज्वी यांच्या ''पांढरा बुधवार या नाटकातही सुसंस्कृत ब्राम्हण घराण्यातील नंदिनीचे शोषणच झाले आहे. तिच्या आई वडिलांनी तीच्या प्रेमाला विरोध केल्यामुळे तीला कुमारी माता म्हणून जगावे लागते. स्त्रीया कितीही पुढे गेल्या तरीही त्यांना संस्कृतीच्या बंधनातून सुटका नाही यांचे दर्शन गज्वीनी यातून केले आहे.

आशय आणि विषय या दोन्ही दृष्टीने ही नाटके वेगवेगळी असली तरी नाटकाचे केंद्र स्त्रिजीवनाशी, त्यांच्या शोषनाशी, सांस्कृतिक बांधिलकीशी निगडीत आहे. दोन्ही नाटकात स्त्रिपात्रेतच होरपळली आहेत. त्यांचे दुःख, वेदना, आणि असहाय्यता यातूनच नाटकाची उत्कटरता अधिक तीव्रतेने व्यक्त झाली आहे. हे मात्र नक्की.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org